# प्रकरण पहिले

# ग्रामीण साहित्य व दलित साहित्य

## प्रकरण पहिले

## ग्रामीण साहित्य व दलित साहित्य

लोकशाही असलेल्या भारतीय स्वातंत्र्याला आज उनीपुरी 48 वर्षे होत आहेत तरी अजूनही भारतीय समाज आर्थिक, सामाजिक अडचणीतून सुखाचा मार्ग काढू शकलेला नाही· जातीधर्म निरपेक्ष, स्वराज्यातील शासन, सर्व थरातील लोकांना विकासाची संधी देऊ शकतो· या आशावादावर भारतीय समाज जीवन संग्रामाला तोंड देत आहे· आमच्या देशात लोकांनी लोकांच्यासाठी चालविलेले राज्य आहे· अस्पृश्यता निवाराण चळवळी होवूनही खेडयापाडयातील स्पृश्य -अस्पृश्य भाव काही प्रमाणात सैल झाले असले तरी पूर्णपणे संपुष्टात आलेले नाही·

आजही सर्वत्र दारिद्रय, अज्ञान, अन्याय, अत्याचार, जुलूम चालू असल्याचे वृत्त रोजच्या वृत्तपत्रातून वाचून मन खिन्न होते· अस्पृश्य समाजाला या यातनांचे भोग अजूनही सुटलेले नाहीत· दलितांचे प्रश्न दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहेत· हे प्रश्न मार्गी लावण्याचे काम अधिक वेगाने होणे आवश्यक आहे· अस्पृश्य समाज जातीय विषमतेच्या परिस्थितीतून वर येणे किती आवश्यक आहे; याचीही सद्य परिस्थितीचा विचार करता कल्पना येते·

दलित साहित्य चळवळ ही ग्रामीण साहित्य चळवळीनंतर उदयास आलेली एक लक्षणीय घटना आहे· साहित्य निर्मितीचा व्यवहार अत्यंत व्यामिश्र असतो· त्यात अनेक घटक एकत्र येवून मिसळलेले असतात· दलित साहित्य चळवळ ही एक सामाजिक चळवळ आहे· प्रथम महाराष्ट्रात व नंतर भारताच्या इतर प्रातांतही दलित साहित्याचा प्रवाह उदयास आला आणि जोमाने बहरला ही वस्तूस्थिती आहे· ग्रामीण साहित्यानंतर तुलनेने नंतर आलेल्या दलित साहित्याचा अभ्यास करण्याची प्रेरणा मला मिळाली· व या प्रेरणेतूनच दलित साहित्याचा अभ्यास मी सुरू केला· त्यात डॉ·भीमराव

गस्ती यांच्या **दोन आत्मकथनाने** माझे मन वेधून घेतले दलित साहित्य भावी काळात सामाजिक जीवनाला विधायक वळण लावेल असा मला विश्वास वाटतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सारखी एक व्यक्ती एका मोठया साहित्य प्रवाहाचे प्रेरणास्थान ठरली आहे. ही घटना अभूतपूर्व आणि अव्दितीय आहे.

ग्रामीण साहित्याचा विकास घडवून आणण्यास अनेक लेखकांचा हातभार लागलेला आहे. ग्रामीण साहित्यात ज्याप्रमाणे खेडेगाव, तेथील जीवनपध्दती, तेथील रीतीरिवाज, शेतीव्यवसाय, निसर्ग, मातीशी असलेला मानवी संबंध, तेथील संस्कृती, आर्थिक, धार्मिक, सामाजिक परिस्थिती व इतर वैशिष्टये खेडयातील लोकांच्या ज्ञानविषयक मर्यादा त्यांचे अज्ञान, रूढी, परंपरा आणि या सर्वातून उद्‌भवणारे वेगवेगळे प्रश्न इत्यादी वैशिष्टये ग्रामीण साहित्यात आणि विशेष करून ग्रामीण कथेत आलेली आढळतात. भारत हा शेती प्रधान देश असून खेडयापाडयानी भरलेला आहे. महाराष्ट्र हा तर खेडयापाडयांचा, द-याखो-यांचा, दगडधोंडयांचा देश आहे. महाराष्ट्राची 80 टक्के जनता आजही खेडयात रहाते.[1] महाराष्ट्रातील ग्रामीण समाज ग्रामीण पध्दतीने रहातो. शेती हाच त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. इ.स. 1920 नंतर महाराष्ट्रावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडलेला आढळतो. आणि साम्यवाद व समाजवाद भारतामध्ये याच काळात सर्वत्र पसरलेला आढळतो. या सर्व परिस्थितीचा परिणाम मराठी लेखन निर्मितीवर पडणे स्वाभाविक आहे.

साहित्य आणि समाज यांचा तसा निकटचा संबंध आहे हे आपण तसे या प्रकरणात पाहिलेच आहे. आजच्या समाजाची जडण घडण करण्याचे बहुमोल श्रेय मराठी साहित्याला द्यावे लागेल. याची ही सर्वांना कल्पना आहे. इ.स. 1963 नंतर ग्रामीण साहित्याची लाट उसळली व अनेक तोलामोलाचे ग्रामीण साहित्य उदयास आले. हे एक नव्या काळातील नवजागरणच म्हणावे लागेल. दलित साहित्य निर्मितीची लाट ग्रामीण साहित्यानंतर उसळली. दलित साहित्यिकांनी काव्य, कथा, नाटक, कादंबरी आणि आत्मकथने या स्वरूपात दलित साहित्य लेखन केले. स्वतःची नियतकालिके सुरू केली व साहित्य संस्था स्थापन केल्या. या काळात झालेल्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय चळवळींचा हा परिपाकच म्हणावा लागेल.

आजपर्यंतचे साहित्य मध्यम वर्गीय पांढरपेशा समाजातील लोकांनी लिहिलेले असल्यामुळे आपल्याच मध्यमवर्गीय समजाचे चित्र आपल्या साहित्यात रेखाटले. स्वातंत्र्यानंतर आपणास लोकशाहीचे हक्क मिळाले. त्यामुळे ग्रामीण जीवनाकडे आपले लक्ष गेले, व ग्रामीण समाज ही आपणास शिक्षणाकडे वळविता आला. शासनाने आखलेल्या शैक्षणिक योजना ग्रामीण समाजाला उपयोगी ठरल्या. शासनाच्या या प्रयत्नामुळे ग्रामीण समाज शिक्षण घेवून लागला. हा ग्रामीण समाज आर्थिकदृष्टया दुर्बल होता. अज्ञान, दारिद्रय, कष्ट या शिवाय त्यांना जीवन जगणे शक्यच नव्हते. अक्षरांची ओळखच काय पण दर्शनही त्यांना घडत नव्हते. खेडयातील इतर प्रकारचे वर्ग पाटील, कुलकर्णी, देशमुख, वतनदार, बागायतदार शेतकरी इ. समाजातील लोकांची सेवा करण्यात बारा बलुतेदार गुंतून गेले होते. आयुष्यभर रखडत होते. पण शिक्षणाने हा वर्ग जागृत झाला. शिकला सवरला, नोक-या करू लागला. या वर्गातूनच ग्रामीण तरूण लेखक ग्रामीण साहित्य लिहू लागले. आज ग्रामीण लेखक म्हणून उदयास आलेले नामवंत साहित्यिक सर्वश्रुत आहेत. श्री.म. माटे, ग.दि. माडगूळकर, द.मा.मिरासदार, रा.रं.बोराडे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, प्रा.डॉ.आनंद यादव, प्रा. द. ता. भोसले. या सर्व लेखकांनी ग्रामीण जीवन अनुभवलेले आहे. यापैकी बहुसंख्य लेखक खेडयातच जन्मले आहेत.

इ.स. 1950 च्या आसपास ग्रामीण लेखकाच्या पहिल्या पिढीने जे लेखन केले आहे ते शैक्षणिक, सांस्कृतिक व ग्रामीण परंपरेच्या संस्कारातून निर्माण झाले होते. घरी येणा-या ग्रामीण माणसांच्या बोलण्या-वागण्यातून, निरीक्षणातून या पहिल्या पिढीने ग्रामीण लेखन केले. हे लेखक खेडयातील असले तरी त्यांची स्थिती ब-यापैकी होती. तसेच ते खेडयात प्रतिष्ठीत म्हणून ओळखले जात होते. या नंतरच्या पिढीतील लोक काबाड कष्ट करणारे, दिवस रात्र राबणारे, पोटाच्या मागे लागलेले, अर्धपोटी रहाणारे असे लोक होते. थोडक्यात म्हणजे हातावरचे पोट असलेले लोक कधी कधी उपाशी राहून पाणी पिवून दिवस काढणारे होते. अशा या वर्गातून ग्रामीण लेखक पुढे येत आहे. त्यामध्ये शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, रा.रं. बोराडे यांचा उल्लेख आवर्जून करता येईल. शासनाने दिलेल्या सवलतीमुळेच या वर्गाला शिक्षणाची

संधी प्राप्त झाली· अक्षर ओळखीमुळे या पिढीने आपले जीवनदर्शन साहित्यातून घडविले अन्यथा ही पिढी निरक्षरच अथवा मजूर म्हणून राहिली असती·

पुढील काळात देश स्वातंत्र्यामुळे अनेक सवलती उपलब्ध झाल्या· मतदानाचा हक्क प्राप्त झाला· गोर गरीब जनतेला शिक्षणाची संधी उपलब्ध झाली· बहुजन समाजात नवजागरण सुरू झाले· व्यक्तित्वाची जाणीव होऊ लागली· जीवनात आशावाद निर्माण झाला· हा आशावाद ग्रामीण साहित्य रूपाने प्रगट होऊ लागला·

दुस-या महायुध्दात म्हणजे इ·स· 1945 नंतर माणसाचा जीवन जगण्याचा आशावाद दुरावला· माणुसकीवरचा विश्वास उडाला· भयानक दारिद्रय भेडसावू लागले· जनता त्रस्त झाली· समाजात होणा-या बदलाचे पडसाद साहित्यात उमटतात· या सर्व परिस्थितीचे चित्र साहित्यात उमटू लागले साहित्याला प्रादेशिकतेच्या दिशा उपलब्ध झाल्या· व्यंकटेश माडगूळकर यांनी माणदेशी माणसाचे वास्तव चित्र रेखाटले· श्री·म·माटे यांनी उपेक्षितांच्या अंतरंगावर प्रकाश टाकला· व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या कथेतून दुःख, दारिद्रय व दैन्याची चित्रे रेखाटली· अशा प्रकारे या काळातील लेखकांनी तत्कालीन सामाजिक परिस्थिती संवेदनशिल अंतःकरणाने जाणून घेवून आपल्या साहित्यातून या परिस्थितीचे चित्र रेखाटले व तत्कालीन ग्रामीण समाजाच्या दुःखाला वाचा फोडली· इ·स· 1950 ते इ·स· 1969 च्या काळात ग्रामीण बहुसंख्य लेखक शहरवाशी झाल्यामुळे त्यांच्या, ग्रामीण साहित्यात त्यांनी बालपणी अनुभवलेले ग्रामीण जीवनच आलेले आढळते· त्यामुळे त्यांचे ग्रामीण साहित्य मर्यादित अनुभवाच्या कक्षेतच फिरत राहिल्याचे आढळते·

पुढील काळातील ग्रामीण लेखकांनी मागील ग्रामीण लेखकांचे अनुकरण कधी सरधोपटपणे तर कधी वेडया वाकडया स्वरूपात केले· त्यामुळे गेल्या पंचवीसतीस वर्षातील ग्रामीण साहित्य एक ठराविक आर्वतात फिरताना आढळते· त्यात एक प्रकारचा सांकेतिकपणा आल्याचे आढळते· उदा·ठराविक पध्दतीची व साच्याची, कथेची शोभा वाढवणारी निसर्ग वर्णने, पसरट व तपशीलवार व्यक्ती वर्णने कारणाशिवाय आचरट ग्रामीण किस्से वापरणे· तथापी ग्रामीण कथा वाङ्मयामध्ये पात्र व प्रसंगाचे औचित्य

ठेवून परिणामकार शेवट करण्याकडे कल आढळतो· ग्रामीण कथा लेखनात ग्रामीण कथा लेखकांनी केलेल्या नव्या प्रयोगामुळे ग्रामीण कथेत एक प्रकारचे नाटय अवतरले· शेवट धक्कादायक व आश्चर्यकारक करण्याचे कौशल्य साधले· त्यामुळे ग्रामीण कथेतील पसरटपणा व उथळपणा कमी होत गेला· जे चांगले व टिकाऊ होते ते काळाच्या ओघात टिकून राहिले व बाकीचे नष्ट झाले· इ·स· 1953/55 च्या आसपास ग्रामीण कथा कलात्मक आटोपशीर तर झालीच· पण तिच्यात संवाद, कौशल्य, सुचकता व सुबक घाट आला· शंकर पाटील सारख्या ग्रामीण कथा लेखकांनी परकाया प्रवेश करून ग्रामीण माणसाच्या मनाचे पदर हळूवारपणे उकलून दाखविण्याचा स्तुत्य प्रयत्न केला व हळूहळू ग्रामीण कथा ही मनोविश्लेषणात्मक केले· त्यात त्यांना कमालीचे यश आले· निसर्गवर्णनाच्या पार्श्वभूमीवर मानवी मनाचे त्यांनी घडविलेले दर्शन निश्चितपणे वेधक, भेदक व प्रभावी आहे यात शंका नाही·

पुढीलांनी मागीलांचा मागोवा घेत पुढील ग्रामीण साहित्याची वाटचाल करणारे प्रा·डॉ·आनंद यादव, शंकर पाटील यांच्या पुढचे पाऊल टाकताना आढळतात· प्रा·डॉ·आनंद यादव यांनी ग्रामीण कथा लेखन करून स्वानुभवाचा प्रत्यय वाचकांना दिला व कथा काव्यात्मक केली· तर चारुता सागर यांनी सामाजिक जाणिवेचा आविष्कार व्यक्त करून आपल्या कथेला भावनिर्भर केले· प्रा· चंद्रकुमार नलगे यांनी ग्रामीण कथा लेखन करून मानवी जीवन व निसर्ग जीवन यांची एकरूपता यशस्वीपणे प्रकट केली· महादेव मोरे यांच्या ग्रामीण कथा लेखनाने ग्रामीण कथामधून विविध प्रकारच्या जाणिवा व्यक्त केल्या· नित्य नवी दिशा शोधणारे मराठी साहित्य ग्रामीण साहित्याच्या नव्या वाटा शोधण्यास पुढे का पाऊल टाकू नये तेथेच का अडखळावे नवे लेखक नवे लेखन घडून यावे व ग्रामीण कथेला नवे पैलू पडावेत असे वाटते·

ग्रामीण साहित्याच्या विकासाच्या वाटचालीत दलित साहित्याचा एक नवा प्रवाह स्वागतार्ह झाला· कृषी जीवना बरोबर बलुतेदारांच्या जीवनाचा मागोवा घेण्याचा एक नवा प्रवाह दलित वाङ्मयामुळे प्रवाहीत केला· कृषी जीवनाशी निगडीत असणा-या दलितांच्या व्यवसायाला ग्रामीण जीवनात महत्वाचे स्थान आहे· शेतकरी आणि बारा बलुतेदार याशिवाय गावगाडा चालूच शकत नाही· खेडयातील समाज रचनेत बदलत्या

काळामुळे बलुतेदारांचे महत्व कमी झाले· यंत्र युगामुळे हातची कामे यंत्र करू लागले· बैलगाडया गेल्या बसेस आल्या· लोहाराचा धंदा बसला· ट्रॅक्टर आले बैलाचे काम कमी झाले· टांगे गेले नी रिक्षा आल्या· खेडयातील माणसे नोकरीच्या निमित्ताने शहराकडे गेली· एकूण समाजरचनेत बदल झाला· बदललेल्या काळाला सामना देण्यास समाज असमर्थ ठरला आणि हा अन्याय दुर्बल घटकावर झाला· दुर्बलांना या संकटातून सोडविण्यासाठी डॉ·बाबासाहेब आंबेडकरांनी दलित चळवळीची मुहूर्तमेढ रोवली· या प्रेरणेतूनच दलित साहित्याचा उगम झाला· आज दलित साहित्याच्या प्रवाहाला गती येत आहे· ते समृध्द होत आहे· बंडाची भाषा, क्रांतिची भाषा ऐकू येत आहे· उपेक्षितांच्या जीवनात परिवर्तन घडण्याची अपेक्षा आहे· जातीयतेला ठोकरून समाज समतेच्या पातळीवर आणण्याचे प्रयत्न चालू आहे· व्यवसायाविरूध्द बंड, जाती व्यवस्थे विरूध्द बंड करण्याचा दलितांचा प्रयत्न आहे· पण समाज व्यवस्थेची चौकट मोडणे कठीण आहे· जाती-पोटजाती इतक्या झाल्या आहेत की त्यामुळे दलित समाजाची अनेक छकले झाली आहेत· परंपरांना आणि परंपरीवाद्यांना धुडकावण्याची भाषा बोलणारे दलित जातीव्यवस्थाही मोडू शकत नाही· आपली पूर्वापार चालत आलेली जातीव्यवस्था एका बाजूला टिकवून ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न तर दुस-या बाजूला सारे काही धुडकावून देण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांच्या व्दिधा मानसिकतेचे द्योतक नव्हे का ?

ग्रामीण समाजाची ही अवस्था अजूनही बदलू शकलेली नाही आणि यामुळेच ग्रामीण भागात दलित आणि दलितेत्तर असा दुहेरी संघर्ष उग्र रूपात आढळत आहे·

## दलित साहित्याचे स्वरूप व प्रेरणा

### 1· दलित साहित्याचे स्वरूप व प्रेरणा

दलित साहित्याचा केंद्रबिंदू माणूस आहे। यावरूनच दलित साहित्याची व्यापकता लक्षात येते· माणूस हा देव, धर्म व देश यापेक्षाही मोठा आहे· "दलित म्हणजे वर्णव्यवस्था आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करू बघणारा । दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा । दलित म्हणजे क्रांतिकारक, दलित म्हणजे बंडखोर, दलित म्हणजे लोकशाहीचा विकास"[2] करणारा· दलित हा आजच्या युगाचा नायक आहे· असे दलित वैशिष्ट्य पोटतिडकीने मांडणारे बाबुराव बागूल दलित वाड्‌मयाच्या जन्माविषयी सांगताना म्हणतात, "गतयुगातले काहीही आणावयाचे नाही असे आम्ही ठरविले आहे· या ठरविण्यातूनच दलित वाड्‌मयाचा जन्म झालेला आहे·"[3] या विधानांचा खोलवर विचार केला तर दलित साहित्यासंबंधी असे म्हणता येईल की, ज्या साहित्याला सम्यक् परिवर्तन अभिप्रेत आहे व जे साहित्य क्रांतीला सामोरे जात आहे ते दलित साहित्य· अर्थात साहित्य कोणतेही असो मग ते ललित असो की दलित असो, ते साहित्यच असते· हे निश्चितच या सर्व साहित्याचा केंद्रबिंदू माणूस आहे· ही गोष्ट विचारात घेतली की, दलित साहित्य हे साहित्याचाच एक भाग आहे, हे स्पष्ट होते· याच व्यापक दृष्टीने दलित साहित्याचा विचार येथे अभिप्रेत आहे·

डॉ·बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे जनक आहेत, आदर्श आहेत· प्रेरणास्थान आहेत आणि अस्मिताही आहेत, हे निर्विवाद सत्य आहे· डॉ·बाबासाहेबांनी जो एक लढा निर्माण केला त्यातून जो माणूस निर्माण झाला, त्या माणसाच्या मनातून दलित साहित्याचा जन्म झाला, अशी व्यापक व्याख्याच दलित साहित्याचे खरे स्वरूप विशद करू शकते आणि त्यातूनच दलित साहित्याचे स्वरूप लक्षात घेता येते· येथे बाबुराव बागूलांच्या विचारांचा मागोवा घेतला तर असे म्हणता येईल की, दलित

साहित्य म्हणजे क्रांतित्व आणि क्रांतित्व ही विश्व जाणीव आहे। महान करूणेने, महान संतापाने करूणा आणि क्रोध जेव्हा एक होतो तेव्हा क्रांतीचा अवतार होतो· अशा व्यापक, तीव्र व उत्कट जाणिवेतून दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे, हे सर्वजण जाणतातच· हिंदू चातुर्वण्य व्यवस्थेमध्ये माणसाचा जन्म गुण-कर्मावर न ठरता त्याच्या जन्मवर्णावरून ठरतो· हिंदू वर्णाश्रम व्यवस्थेत जाती-जन्मावरून ठरत गेल्या आणि त्यामुळे उच्च-नीचतेच्या कल्पना बळावत जावून स्पृश्य-अस्पृश्यतेचे भेद निर्माण झाले·

समाजवादी देशांनी विज्ञाननिष्ठ दृष्टी ठेवली व ही दृष्टीच त्यांच्या जीवनाची प्रबळ प्रेरणा झालेली आहे· त्यामुळे सामान्य माणसाबद्दल मानव बंधुत्वाची जाणीव निर्माण झाली आहे· भारत सोडला तर इतर देशात वर्गलढा यशस्वी झालेला आहे· कारण त्यांच्या देशात "प्रोलिटेरिअट" मजूर लोक श्रमजीवी वर्ग आहे· तो अधिक प्रबळ आहे· भारतामध्ये प्रोलिटेरिअट तसेच "सोशल प्रोलिटेरिअट" म्हणजेच दलित आहेत· या दोघामध्ये जातीभेद निर्माण होवून स्पृश्य-अस्पृश्य असे विभाजन झाले· हे दोन्ही श्रमजीवी वर्ग श्रमजातीव्यवस्थेमुळे ते आपापसात लढत बसले· त्यामुळे आपल्या देशात अस्पृश्यता, दारिद्र्य, अज्ञान, लाचारी वाढत गेली· गुलामगिरीची प्रवृत्ती वाढत गेली· या प्रवृत्तीबरोबरच सामंतशाही, भांडवलशाही, देवधर्माचा हवाला देवून इतरावर अत्याचार करण्याची प्रवृत्ती वाढत गेली व आजही ही प्रवृत्ती वाढत आहे· आमच्या देशात अंधश्रध्दा, रूढी. परंपरा, शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, चमत्कार, गुरू व नेते यांच्या अधीन होण्याची प्रवृत्ती बळावत गेली, त्यामुळे मानसिक दास्यत्वाची प्रवृत्ती अधिक बळकट झाली· अर्थात "या गोष्टी व्यक्तींना मानसिक दास बनवितात· सुशिक्षितांमधील बहुतांश लोकही असेच मानसिक दास आहेत·"[4] सामाजिकदृष्ट्या विचार केला तर ही गोष्ट अत्यंत वाईट आहे· ती दूर करण्यासाठी हे मानसिक दास्य नष्ट करण्यासाठी बौध्दिक व वैचारिक जागृतीची अत्यंत आवश्यकता आहे· महात्मा ज्योतीराव फुले यांच्यासारख्या कर्त्या सुधारकाने हे सर्व जाणले होते· वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था व स्त्रीदास्य नष्ट करण्यासाठी त्यांनी जे धैर्य दाखविले ते अतुलनीय आहे· ज्योतिबांनी जन्मनिष्ठ उच्च-नीचतेवर घणाघती घाव घातले· तसेच सत्यशोधक समाजाची स्थापना करून उच्चवर्णियांच्या श्रेष्ठतेविरूध्द बंडाचे निशाण उभारले· राजकीय

पारतंत्र्यामुळे प्रजेची मने मरून जातात, तशीच कोणत्याही जातीच्या जन्मसिध्द श्रेष्ठतेमुळे इतर जातीची मने कुस्करून जातात. याचे दलित समाज हे जिवंत उदाहरण आहे. देवता या ब्राह्मणांच्या व राजपुरूषांच्या अंगी वास करतात, असा शास्त्र सिध्दांत मांडून दलितांची युगे नि युगे उपेक्षा झाली. बहुजन समाजामध्ये बौध्दिक व वैचारिक जागृती करून म.फुले यांनी प्रत्यक्ष कृती करून धैर्य दाखविले. त्यामुळे पुढच्या अनेक पिढयांच्या कर्त्या पुरूषांना स्फूर्ती मिळाली. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या बहुजन समाजाच्या आत्म्याचे आर्त आक्रंदन प्रथम ऐकणारा आणि परंपरेच्या शृंखला सोडतो. बहुजन समाजाला आत्मोध्दाराचा मार्ग दाखविणारा ख-या अर्थाने सत्य धर्म शिकविणारा "महात्मा" ज्योतिबा फुले होते. जातियवादांचे स्पृश्य-अस्पृश्यतेचे अमानुष दुःख दूर करण्यासाठी व लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी व समाज विषमतेची जातियतेतून निर्माण झालेली दुःखे दूर करण्यासाठी गौतम बुध्द, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स्, लेनिन, माओ या महापुरूषांनी आपल्या कर्तृत्वाचे योगदान दिले आहे, त्याचा कधीही विसर पडणार नाही. या सर्व मानवतेच्या प्रेषितांनी, द्रष्ट्या पुरूषांनी माणूस हा देव, धर्म व देशापेक्षाही मोठा असतो, असा संदेश जगाला दिला आहे व त्यांनी बौध्दिक आणि वैचारिक जागृती करून समाजाला खडबडून जागे केले आहे. या वैचारिक परिवर्तनाच्या उत्कट पार्श्वभूमीवरच दलित साहित्याचा जन्म झाला आहे. या साहित्याचे स्वरूप व वैशिष्टये लक्षात घेवून डॉ.भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" या आत्मचरित्र कथनाचा सामाजिक व वाङ्मयीन अभ्यास करण्याचा येथे मुख्य उद्देश आहे.

गेल्या काही वर्षात दलित लेखकांनी आपली आत्मकथने मोठया प्रमाणावर लिहून ललित वाङ्मयाच्या कक्षा विस्तारित केल्या आहेत. दलित साहित्य निर्मितीचा हा एक महत्त्वाचा आविष्कार ठरला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून आणि वक्तव्यातून आपले कितीतरी जीवनानुभव अनेकदा मांडले आहेत. त्यांच्या पूर्वी अनेक अस्पृश्य संत मंडळींनीही आपल्या अभंग रचनेतून आपल्या व्यथा, वेदना मांडल्या आहेत. तथापी या संतांची दुःखे प्रामुख्याने विशिष्ट भक्तिभावनेतून प्रकट झाली होती. पण तरीही त्यातून सामाजिक पीडा तीव्रतेने पण दबलेल्या मनाने व्यक्त झालीच आहे. चोखा मेळ्याचे "विटाळाचे अभंग" हा या संतांचा मानसिक

आविष्कार आहे. उदा.

"यातीहीन महार । पूर्वी निळाचा अवतार।।"

असा उल्लेख चोखा करतो.

"बहुत हिंडलो देशदेशांतर । परि नाही मन स्थिर झाले कोठे।।"

हा परमेश्वर भक्तीतून प्रकट झालेला त्याचा मनोभाव विचारात घेण्यासारखा आहे. परमेश्वराच्या संकीर्तनात आयुष्य वेचणा-या या अस्पृश्य संताना कधीच कर्मविपाकाच्या फे-यातून बाहेर पडता आले नाही.

"तुझीचे दारीचा कुतरा । नको मोकलू दातारा ।।"

ही चोख्याची आर्त हाक त्याला अगतिकतेची, असहायतेची साक्षच नव्हे का ? अध्यात्माचा धागा धरून जीवनाचा दुर्धर प्रवास या संतानी असाहयपणेच सुसहय करून घेतला होता, हेच येथे स्पष्ट होते. कर्म मेळयाचा देवाची लाज काढणारा अभंगही येथे विचारात घेण्यासारखा आहे. प्रचलित समाजव्यवस्थेमुळे हे दुःख आपल्या वाटयाला आले आहे, असे निषेधात्मक सूर यासारख्या संतांनी कोठेही व्यक्त केलेले नाही. प्रा.चंद्रकुमार नलगे व गंगाधर पानतावणे म्हणतात त्याप्रमाणे पूर्वजन्माच्या पातकामुळे आपण महार झालो ही धारणा त्यांच्या प्रांजळ मनाचा उद्‌गार आहे, यात शंका नाही. चोखा मेळा, बंका महार, सोयरा, निर्मळा, कर्ममेळा या अस्पृश्य संतांच्या अभंगातील आत्मपर उल्लेख दलित आत्मकथनाच्या संदर्भात कालसंदर्भ म्हणून निश्चितपणे महत्त्वाचे आहेत. आजच्या विद्रोही आत्मकथनाच्या संदर्भात या भूतकाळातील आविष्काराचा संदर्भ कोणाचेही अंतःकरण विध्द करणारा आहे, हे कोणासही नाकारता येणार नाही.

## 2. दलित वाङमयाच्या प्रेरणा

दलित वाङमयाच्या प्रमुख प्रेरणा दोन आहेत. पहिली व प्रमुख प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य ही होय. महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहा-पासून ते बौध्द धर्म स्वीकारापर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या चळवळी व त्यांनी सांगितलेले तत्वज्ञान ही दलित वाङमयाची प्रमुख प्रेरणा आहे. हजारो वर्षाच्या भागवत परंपरेने म.फुले यांच्या घणघाती तत्वविचाराने व कार्याने आणि

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

महात्मा गांधीजींच्या हरिजन करूणेनेही दलित दुःख दूर होऊ शकत नव्हते, ही विदारक वस्तुस्थिती डॉ·बाबासाहेब आंबेडकरांना जाणवली· त्यांनीही मार्क्सचे तत्वज्ञान वाचलेले होते· त्यातील आर्थिक विषमतेचा सिध्दांत त्यांना व सर्वच दलितांना पटणारा होता· मानवी जीवनातील दुःख हे मुख्यतः निःसंशयपणे आर्थिक विषमतेने निर्माण होते· पण भारतातील चिवट जातीव्यवस्था अशी बळकट आहे की वर्ग विग्रहाचे तत्वज्ञान येथे रूजू शकत नाही· जोपर्यंत उच्च-नीच असा वर्णभेद शिल्लक आहे तोपर्यंत काहीच सुधारणा घडू शकत नाही· या जुन्या व्यवस्थेला विरोध करण्याची प्रेरणा हीच दलित वाड्मयाची प्रमुख प्रेरणा आहे, हे स्पष्ट होते· कोणत्याही वाड्मयप्रकाराची सर्वांग परिपूर्ण व्याख्या करणे कठीण असते· व्याख्येवरून त्या त्या वाड्मयप्रकाराशी सम्यक् दर्शन घडू शकत नाही· काही ना काही अपूर्णता रहातेच· दलित साहित्याचा विचार करताना अनेक दलित साहित्यिकांनी, समीक्षकांनी, विचारवंतानी दलित साहित्याची व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे· त्यावरून दलित साहित्याची काही ठळक वैशिष्टये लक्षात घेता येतात· बाबुराव बागूलांच्या[5] विचाराप्रमाणे जुन्या वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणारा म्हणजे दलित होय· हा विचार लक्षात घेता येतो· तसेच दलितांच्या वेदनांचे साहित्य म्हणजे दलित साहित्य हा अण्णाभाऊ साठे यांचा विचार चिंतनीय आहे·

राजा ढाले[6] यांच्या विचारानुसार दलित लेखकांनी दलिताविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक, विद्रोही साहित्य म्हणजे दलित साहित्य होय आणि डॉ·वानखेडे यांच्या विचारानुसार जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व दलित· डॉ·सदा क-हाडे म्हणतात, "आर्थिकदृष्टया व मानसिकदृष्टया मिळून एक सर्व समावेशक दलित वर्ग मानता येईल· यात कामगार, शेतमजूर, उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील· ज्यांची पिळवणूक होते ते दलित होय·"[7]

या देशातील समाज व्यवस्थेमध्ये सगळ्यात अधिक जर कोण पिळला गेला असेल तर तो अस्पृश्य समाज· आजही तो सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व मानसिकदृष्टीने शोषण भोगतो आहे· त्यामुळे भारतीय समाज संस्कृतीच्या वास्तवात तोच खरा दलित आहे· दलित साहित्य म्हणजे फक्त दलितांनी लिहिलेले

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY

साहित्य नव्हे. म्हणजेच दलित असणे व त्याने लिहिणे म्हणजे दलित साहित्य नव्हे, तर माणसांच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातीच्या श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य होय. हे विचार अधिक ग्राह्य धरणे उचित ठरेल.

एकंदरीत दलित शब्दाचा विचार केला तर असे म्हणता येईल की, माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारला आहे, असा समाजातील व्यक्तींचाच समूह म्हणजे दलित. भारतातील समाजव्यवस्थेत सामाजिकदृष्टया, आर्थिकदृष्टया व सांस्कृतिकदृष्टया दलित असलेला समाजगट म्हणजे दलित असे म्हणता येईल. अशा समाज गटाच्या जीवनाचे चित्रण ते दलित साहित्य आहे. दलित साहित्य हे अशा समाजगटास आलेल्या अनुभवांची अभिव्यक्ती असते. तात्पर्य हेच की, दलित साहित्य हे त्याच्या निर्मात्याकडून दलित वाङ्मय ठरत नाही, तर त्याच्या अनुभवावरून तसेच त्या अनुभवांच्या निराळेपणावरून दलित साहित्य ठरत असते. दलित साहित्यात व्यक्त होणारा निषेध, प्रक्षोभ, विद्रोह हा मर्यादित वर्गाचा आहे. यात येणारे अजून कितीतरी वर्ग आहेत. ते आदिवासी, भटक्या जमाती, गुन्हेगार समजल्या जाणा-या जमाती आजही उपेक्षित जीवन जगत आहेत.

अज्ञानाच्या व दारिद्र्याच्या खाईत जन्माला येवून ही माणसे केव्हातरी मरून जात आहेत. मरेतोपर्यंत असले जीवन आपल्या वाटयाला का आले हे त्यांना यत्किंचितही माहीत नसते. जन्माला घातले म्हणून जगायचे एवढेच त्यांचे जिणे असते. या अशा माणसांच्या प्रक्षोभाला अजून जेवढी वाचा फुटायला हवी तेवढी फुटलेली नाही. हे लक्ष्मण माने यांच्या "उपरा", लक्ष्मण गायकवाड यांच्या "उचल्या" किंवा डॉ. भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" यासारख्या आत्मकथनातून हा प्रक्षोभ प्रकट झाला तरी तो अपुराच आहे. दलितांचे हे साहित्य सुरुवातीला काव्यरूपाने प्रकट झाले. आपण जे उपेक्षित जीवन जगलो व ज्यांनी आपणास असले अमानुष जीवन जगायला भाग पाडले, या भावनांचा प्रक्षोभ प्रथम कवितेतून प्रकट झाला. ही एक प्रकारची उग्र व उत्कट चीड आहे. ती दलित साहित्यातून प्रकट होते. अनुभवाच्या अभिव्यक्ती-बरोबरच हा भावनांचा प्रक्षोभ, राग, संताप प्रकट होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे

दलित साहित्याची भाषा वेगळी, दाहक रूप घेवून बाहेर पडले· ती विद्रोहाची, नकाराची क्रांतीची भाषा आहे· दलित साहित्यातील क्रांतीचे स्वरूप केवळ वाड्मयीन नाही तर ते सामाजिक क्रांतीचे आहे· शतकानुशतके दलितांच्यावर अन्याय होत गेला आहे व अजूनही तो कमी झालेला नाही· या वेदक जाणिवेमुळे दलित आक्रंद करतात· तो विद्रोही भाव त्यांच्या साहित्यात प्रकट असतो· परंपरेने चालत आलेली समाजरचना व त्यात प्रचलित असलेल्या परंपरा यातच आज दलितांवर होणा-या अन्यायाची कारणे दडलेली आहेत, असे त्याला तीव्रतेने जाणवल्यामुळे प्रचलित समाजरचना उलथून पाडण्याची ते भाषा बोलतात व सर्व समाजरचना बदलून टाकण्यासाठी ते आपलीसर्व शक्ती पणाला लावू पाहात आहेत· अशा या नकारात्मक विद्रोही वृत्तीतून दलित वाड्मयाची निर्मिती होत आहे· या दलित वाड्मयनिर्मितीमागे एक प्रकारची प्रखर सामाजिक जाणीव आहे आणि या तीव्र जाणिवेनेच दलित आपल्या दुःखाला, द्वेषाला, विद्रोहाला वाचा फोडण्याचा प्रांजळ प्रयत्न करीत आहेत· हीच प्राचीन बंडाची एक ठिणगी आहे· ही ठिणगी विझेल असे तिचे स्वरूप नाही· नकार, विरोध, संताप हा या साहित्याच्या रोमारोमातून बाहेर पडत असल्यामुळे त्यातील दाहकता जाणवू लागली आहे· यात शंका नाही· तसेच समाजात स्थित्यंतर घडू पाहात आहे, याचीही कल्पना या वाड्मयनिर्मितीमुळे येऊ लागली आहे· मराठी साहित्याला सात-आठशे वर्षाचा इतिहास आहे· संस्कृत, प्राकृत वाड्मयाला यापेक्षाही मोठी परंपरा आहे· आजपर्यंत संस्कृतातून, प्राकृतातून, मराठीतून विपूल वाड्मयनिर्मिती झाली आहे पण आमच्या देशातील उपेक्षितांच्या जीवनाची साहित्यात कोणीही दखल घेतली नाही·

महानुभावपंथीय वाड्मय, संत वाड्मय, पंडित वाड्मय, शाहिरी वाड्मय आणि आजपर्यंतचे आधुनिक आणि नवकाव्य यात या दलितांच्या दुःखाला साहित्यात कोठेही स्थान राहिलेले आढळत नाही· हे सर्व साहित्य समाजातील विशिष्ट वर्गासाठी होते, असेच चित्र आढळते· मध्यम वर्गाभोवती फिरणा-या मराठी साहित्याच्या एका कोप-यातदेखील दलित वर्गाला प्रवेश दिलेला आढळत नाही·

दलित समाजातील विद्रोहाची पेटती मशाल आज साहित्यात झळकते आहे, याचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे· दलितांना आज त्यांची भाषा, त्यांचा आवाज,

त्यांचे स्वत्व समजले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना जागृत केले. डॉ.आंबेडकर जन्माला आले नसते तर अस्पृश्य समाज होता तेथेच राहिला असता. पण त्यांच्या येण्यामुळे उपेक्षित माणूस - माणूस म्हणून उठला त्याने देव, धर्म, देश याचा अभिमान, दुराभिमान काहीच बाळगला नाही. ते आले आणि "अस्पृश्य समाजात माणूसपणाचे वादळ उठू लागले, ते गरगरू लागले. तसे देवाच्या व्यवस्थेचे रखवाले झुंजीला उठले. या लढयात प्रचंड संहार झाला. "इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा।" या पध्दतीने अनेक संकेत, रूढी, परंपरा, श्रध्दा, देव यांचा होम झाला आणि दलित समाजातील निरक्षर माणूस एकदम वेगळा झाला, नवा झाला."[8] आता दलित आपल्या तीव्र विद्रोह वृत्तीने साहित्यात एक नवीन क्रांती घडवून आणीत आहेत. हा नव्याने निर्माण झालेला आशय फार वेगळा आहे. त्यातील नाविन्य लक्ष वेधून घेत आहे. प्रचलित समाज व्यवस्थेने ज्यांना नाकारले, पिळले त्यांच्या जीवनाचे शोषण केले, त्या समाज व्यवस्थेला व परंपरेला नाकारण्याच्या वृत्तीतून निर्माण झालेले दलित साहित्य स्फोटक आकार घेत आहे. वेदना, नकार आणि विद्रोह या तीनही पातळ्यावरील संघर्ष दलित साहित्याचे वैशिष्टय ठरत आहे.

## ३. दलित साहित्याचा विकास

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे निबंध, भाषणे, त्यांचे विचार या सर्वांमुळे दलित समाजावर एवढा प्रचंड प्रभाव पडला की, या प्रभावाने प्रभावित झालेला फार मोठा कवी वर्ग निर्माण झाला. या आंबेडकरप्रणीत दलित कवींनी गीते लिहिली, जलसे केले आणि नकारात्मक भूमिका विशद करून उपेक्षितांना हिंदू धर्माच्या बाहेर ओढून काढण्याचे महान कार्य केले. यामुळे दलित साहित्य प्रचारकी थाटाचे होऊन ते एकसूरी होऊ लागले, त्याला तोच तोपणा येऊ लागला.

दलित चळवळ जशी वाढत गेली तसे लोकांना शिक्षणाचे महत्त्व समजू लागले. ते शिकू लागले. नोक-या करू लागले, याचा दृश्य परिणाम म्हणजे एक मध्यम वर्ग अस्पृश्य समाजात तयार झाला. त्यामुळे अस्पृश्य समाज पांढरपेशा समाजात वावरू लागला, तोही पांढरपेशा होऊ लागला. काहींनी तर बाबासाहेबांनाच ब्राह्मण होण्याचा आग्रह धरला. काहींनी आपल्या जन्मदात्या आईबापांनाच सोडून दिले.

ह्या पराभूतांच्या काळात फडके, खांडेकरांचे अनुकरण कथा लिहिण्याचेही प्रयत्न झाले. पण या लेखनाला कोणा वाचकाची साथ मिळाली नाही.

यानंतर लेखक वर्ग तयार होऊ लागला. त्यात अण्णाभाऊ साठे अग्रभागी धरावे लागतील. तमाशाच्या स्वरूपाची कथा लिहून दलितांना एक थोर कथालेखक मिळाला. मध्यमवर्गीय मराठा, श्रीमंत शेतकरी वर्गाचे जीवन रंगवणारी कादंबरी त्यांनी लिहिली. हिंदूच्या नैतिक मूल्यावर त्यांनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला व त्यातून वर्ग कलहाचे तत्वज्ञान मांडले. त्यांच्या कथा-कादंब-यातून अस्पृश्यतेसंबंधीचा, खेडे खेडयांची जातीयवादावर असलेल्या उभारणीसंबंधीचा असंतोष फारसा नव्हता.

अणाभाऊ साठे लिहीत होते तेव्हाच शंकरराव खरातांच्या लेखनीला लेखनप्रेरणा मिळाली. त्यांनी अस्पृश्यतेचे दुःख सहन करणारे परंतु सोशिक नायक-नायिका व इतर गौण पात्रे चित्रित करून अस्पृश्यतेतील विदारक दुःख व तसेच दैन्य दाखवून अस्पृश्यतेबद्दल करूणा निर्माण केली.

याच सुमारास दुभंगलेल्या मनस्थितीत वावरणा-या तरूण कवींनी मराठी कवितेच्या नवीन प्रेरणेतून कविता केल्या. अस्पृश्यतेच्या दुर्दैवी जन्मखुणेला विसरता येत नाही आणि पांढरपेशा होवूनही पांढरपेशा म्हणायला दबकणा-या कवींनी ज्या कविता लिहिल्या त्या ख-या अर्थाने तत्कालीन कवींच्या मनाचा स्वाभाविक आविष्कार वाटाव्या अशा नव्हत्या. "ह्या देवळांच्या आणि देवांच्या देशात आणि येथल्या धर्माने हीन मानलेल्या जातीत जन्म घेतल्याचे दुःख अजूनही त्याला छळीत असते, जाळीत असते, ते दुःख व्यक्त करायला दडपणरहित वातावरण व प्रकाशन नसल्याने या दुभंगलेल्या सुशिक्षितांनी खोटी कविता लिहिली ती तशी खोटी होती, तशी खरीही होती. कारण ती त्यांच्यातील मध्यमवर्गीय मनोवृत्तीतून आलेली होती. म्हणून खरी होती. परंतु त्यांच्या तळाला बांधलेल्या जीवनाच्या दृष्टीने ती खोटी होती."[9] असे वर्णन बाबुराव बागूलांनी केले आहे ते त्या काळातील कवीच्या मनाचे यथार्थ दर्शन घडविणे.

दलित साहित्य कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा अनेक बाजूंनी लिहिले जात आहे. दलित कवितेचे प्रेरणास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना साहित्यामध्ये स्वतःचा हुंकार मिळवून दिला.

शतकानुशतके पिळल्या गेलेल्या मनाचे आक्रोशातून दलित कवितेचा जन्म झालेला आहे· आपले दाहक अनुभव, आपल्या व्यथा, वेदना व दुःख मनाचे आक्रंदन व या सर्व जिवंत अनुभूतींची अभिव्यक्ती दलित कवितेमधून केली आहे· एकंदरीत दलित साहित्याचा जन्मच दुःखातून झालेला आहे, हे निर्विवाद सत्य आहे· माणसाच्या मुक्तीच्या संघर्षातून दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे· अनेक दलित कवी या काळात कविता करू लागले· त्यात किसन फागू, शाहीर घोंगडे, वामन कडवे, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, दया पवार, ज·वि·पवार, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळ, प्रल्हाद चेंदवणकर यांनी आपल्या अंतःकरणातल्या वेदना आपल्या कवितेतून मुखर केल्या व सामाजिक विषमतेवर तीक्ष्ण प्रहार केले·

श्री·म·माटे हे वास्तविक दलितांचे दुःख प्रथम साहित्यात मांडणारे दलित साहित्याचे अग्रदूत आहेत· "माणूसकीचा गहिवर"मधून त्यानी जे कथालेखन केले, ते ख-या अर्थाने त्यांच्या मनातील माणुसकीच्या गहिवराचा आविष्कार आहे· "बन्सीधर तु आता कोठे रे जाशील।" ही त्यांची पहिली हृदयद्रावक कथा· त्यानंतर कथालेखनाचा ओघ पुढे हिंमतीने चालू ठेवण्याचा मान अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, दया पवार, योगीराज वाघमारे, वामन इंगळे, वामन होवाळ, माधव कोंडविलकर, केशव मेश्राम, भास्कर चंदनशिव अशा लेखकांनाच द्यावा लागेल· अस्पृश्य म्हणून समाजाने केलेली उपेक्षा, अवहेलना, अमानुष छळ, पिळवणूक अशी कितीतरी दुःखे या कथाकारांनी आपल्या कथेतून उत्कटपणे मांडून दलितांना अंतर्मुख केले आहे·

दलित कादंबरीचे क्षेत्र काही अंशी दुर्लक्षित झाल्यासारखे दिसते· कविता व कथांचे विस्तारित क्षेत्र निश्चितपणे कौतुकास्पद आहे· अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, केशव मेश्राम, हि·मो·बनसोडे, शंकरराव खरात आदि कादंबरीकारांनी कादंबरी क्षेत्र जिंकून नव्या सामाजिक व वाङ्मयीन आविष्कारात आपले वेगळेपण सिध्द केले· अलिकडे एकांकिा वाङ्मयप्रकार हाताळण्याचे प्रयत्न करून (दलित मनातील दुःख, प्रक्षोभ आणि संघर्षाचे चित्र रंगभूमीवर आणून दलितांच्या दुःखांना दृक श्राव्य स्वरूपात चित्रित करण्याचा प्रयत्न म·भि·चिटणीस, भि·शी·शिंदे, योगीराज वाघमारे, प्रेमानंद गजवी, श्रीरंग सुर्वे, डॉ·गंगाधर पानतावणे, प्रा·दत्ता भगत यांनी केला आहे·)

कथा, कविता, कादंबरी वाङ्मयप्रकारामध्ये अंशतः सत्याच्या वास्तवावर कल्पनेची दुनिया उभारलेली असते· या सर्व प्रकाराच्या वाङ्मयातून संताप, चिड, प्रक्षोभ, मनस्ताप, बंडखोरीवृत्ती नवसमाज निर्माण करण्याची जिद्द प्रकट झालेली आहे, यासंदर्भात गं·बा·सरदार सांगतात, "दलित साहित्याच्या सध्याच्या स्थितीत समाज परिवर्तनाला उपकारक ठरणारी निषेधपरता व नकार प्रवृत्ती यांना प्राधान्य मिळाले तर ते स्वाभाविकच आहे· कोणत्याही क्रांतीकारक साहित्याचा तो आवश्यक भाग असतो· जुन्या कालबाहय झालेल्या परंपरेवर प्रहार केल्याखेरीज तिच्यातील जीर्णांश निपटून काढल्याखेरीज परिवर्तन होत नाही·"[10] नवे जग व नवे साहित्य निर्माण करू पाहणारे दलित लेखकांना ते इशारा देताना सुचित करतात· जुन्याची पालेमुळे वास्तवात इतकी खोलवर गेलेली असतात की, जुने नष्ट करताना वास्तवाची पुनर्घटना करण्याचा प्रश्न उपस्थित होतो· जुने कधीच नष्ट होत नाही· उलट परिवर्तनाच्या प्रक्रियेमधून जुन्यातील सत्वांश नव्या चौकटीत, नव्या व्यवस्थेत अंतर्भूत होतो· जुन्याचे स्वरूप बदलते व त्याला नवा अर्थ प्राप्त होतो· जीवनाच्या प्रत्यक्ष परिवर्तनामध्ये सातत्य असते· दलित साहित्याच्या मुळाशी जी बंडखोरपणाची प्रेरणा आहे, ते त्याचे प्राणतत्व आहे· असे सांगून प्रा·गं·बा·सरदारांनी दलित लेखकांना फक्त तेवढयावर विसंबून न राहता तत्वचिंतन, विद्याव्यासंग, तंत्र साधन, भाषा प्रभुत्व या गोष्टींचीही दलित वाङ्मयाच्या प्रगतीला आवश्यकता आहे, असे बजाविले आहे· कथा, कविता, कादंबरीच्या रूपाने मराठीत 1970 च्या आसपास सृजनशील साहित्य वेगाने निर्माण झालेले आढळते· या नव्या निर्मितीत दलित कवितेचा जितका मोठा वाटा आहे, तितका कोणत्याच अन्य वाङ्मयप्रकारात आढळत नाही· या सर्व वाङ्मयप्रकारात कल्पनेचे प्राबल्य अधिक असते· पुढे पुढे कवितेची धारही बोथट होत गेली आणि जीवनात प्रत्यक्ष भोगलेले, क्षण झेललेले प्रसंग आणि भेटलेली माणसे यांचे जसे आहे तसे चित्रण करण्याकडे प्रवृत्ती वाढत गेली आणि या वास्तव अतिवास्तव अनुभवाची अनुभूती चित्रित करण्यासाठी आत्मकथन, आत्मचरित्रे, आत्मकथा या नव्या आकृतिबंधात दलित साहित्याचा प्रवास सुरू झाला· अशाप्रकारे आत्मकथन आणि कविता या वाङ्मय-प्रकारांनी (दलित) मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे·

दलित साहित्यिकांचे आत्मकथन या दृष्टीने अधिक लक्ष वेधून घेते. दया पवारांचे "बलुतं", माधव कोंडविलकरांचे "मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे", लक्ष्मण माने यांचे "उपरा", प्र.ई.सोनकांबळे यांचे "आठवणीचे पक्षी", शंकरराव खरात यांचे "तराळ अंतराळ", राम नगरकरांचे "रामनगरी", दादासाहेब मोरे यांचे "गबाळ", शरणकुमार निंबाळे यांचे "अक्करमाशी" रूस्तुम अचलखांब यांचे "गावकी", उत्तम बंडू तुपेंचे "काटयावरची पोटं" व डॉ.भीमराव गस्ती यांचे "बेरड व आक्रोश" या दलित आत्मचरित्रांनी मराठी वाड्मयात मोलाची भर घातली आहे. या सर्व लेखकांनी आपण व आपल्या समाजाने भोगलेली दुःखे व यातना मांडून दलितांच्या व्यक्तिगत व सर्व समाजाचे दुःख मांडून प्रतिनिधित्व केले आहे. जी दुःखे एका व्यक्तीची तीच सर्व दलित समाजाची दुःखे आहेत. हेच या आत्मकथनातून जाणवते. त्यामुळे स्वतः लेखकांचे व तो ज्या समाजात जन्मला त्या संपूर्ण दलित समाजाच्या पीडीत जीवनाचे चित्र त्या आत्मचरित्र कथनातून चित्रीत होते.

## संदर्भ सूची


1· ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या,
प्रा·डॉ·आनंद यादव
पान क्र· 9
प्रथम आवृत्ती - 1979
प्रकाशन - अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस,
चित्रशाळा बिल्डिंग, सदाशिव पेठ, पुणे 30·

2· दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान,
बाबुराव बागूल,
पान क्र· मुखपृष्ठाच्या मागील पान,
प्रथम आवृत्ती, 15 ऑगस्ट 1981,
बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर - 9·

3· दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान,
बाबुराव बागूल,
पान· क्र· मुखापृष्ठाच्या मागील पान,
प्रथम आवृत्ती, 15 ऑगस्ट 1981,
बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर - 9·

4· नव्या ऊर्मी नवी क्षितिजे,
प्रा·गं·बा· सरदार, संपादक - प्रा·डॉ·ल·रा· नसिराबादकर,
पान क्र· 90,
प्रथम आवृत्ती, 15 जुलै 1987, संजय प्रकाशन - पुणे 4·

5· दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान
बाबुराव बागूल,
पान क्र· 271,
प्रथम आवृत्ती, 15 ऑगस्ट, 1981
बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर - 9·

6· ज· वि· पवार यांच्या "नाकेबंदी" काव्य संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत
- राजा ढाले·

7· दलित आत्मकथन
संपादक - प्रा· चंद्रकुमार नलगे व डॉ·गंगाधर पानतावणे
निमित्त पान क्र· 2, 4
प्रथम आवृत्ती 26 जानेवारी 1986·
कल्पना मुद्रणालय, पुणे·

8· दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान,
बाबुराव बागूल,
पान क्र· 15
प्रथम आवृत्ती, 15 ऑगस्ट 1981,
बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर - 9·

9· दलित साहित्य - आजचे क्रांतिविज्ञान,
बाबुराव बागुल,
पान क्र· 7
प्रथम आवृत्ती , 15 ऑगस्ट 1981,
बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर - 9·

10· नागरी परंपरेचे लोकविकास, डॉ·एस्·एस्· भोसले
पान क्र· 139, प्रथम आवृत्ती, जुलै 1987·
सुरेश एजन्सी, पुणे·